**<u>सं.फौ.ख.क्र.१९१/२०२१</u>**

**लक्ष्मी स्प्रे पेंटीग वि. तिरूपती ट्रान्सलाईन्स व इतर.**

**<u>निशाणी क्र.२४ अ च्या पुढे.</u>**

**<u>फिर्यादी साक्षीदार क्र.१ सुभाष जाधव यांचा उर्वरित उलटतपास आरोपी क्र.२ तर्फे श्री.आर. यु. चौधरी, विधीज्ञ यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरणातील चेक आरोपी क्र.२ ने कधीही सही करून दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ ला पैसे दिल्याचा कोणताही लेखी पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या वैयक्तीक खात्यावर माझा कोणताही व्यवहार झाला नाही. मी आरोपीच्या वैयक्तीक खात्यावर व्यवहार झाला आहे हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, संपूर्ण रक्कम ही फर्मच्या नावाने जमा होते. साक्षीदार सांगतो की, काही रक्कम फर्मच्या नावाने व काही रक्कम वैयक्तीक खात्यावर जमा होते. लक्ष्मी स्प्रे पेंटीग प्रायव्हेट लि. व तिरूपती ट्रान्सलाईन ॲण्ड कंपनी या दोन्ही वेगवेगळया आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.३ च्या नावे तिरूपती ट्रान्सलाईन या कंपनीचे ए.टी.एम.कार्ड आहे. संतोष खोरे हे भोडणी येथे राहण्यास आहेत. तिरूपती ट्रान्सलाईन कंपनीचे वालचंदनगर येथे कॅनरा बँकेत खाते आहे. तिरूपती ट्रान्सलाईन कंपनीचे सर्व व्यवहार कॅनरा बँकेतील खात्यातून होत होते. आरोपी क्र.३ चे तिरूपती ट्रान्सलाईन कंपनीच्या कॅनरा बँकेतील खात्याला मोबाईल नंबर व इमेल लिंक केला आहे का कसे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.३ याने आरोपी क्र.२ च्या फर्मच्या कामात अडचणी येवू नयेत म्हणून को–या चेकवर सहया घेवून ठेवल्या होत्या. मी सरतपासात रक्कम दिल्याचा तारखा नमूद केलेल्या नाहीत. मी सरतपासात रक्कमा दिल्याचा तपशील नमूद केलेला नाही. मला चेक कधी बँकेत भरला, नोटीस कधी दिली याच्या तारखा सांगता येणार नाहीत. साक्षीदार सांगतो की, बघाव्या लागतील. वालचंदनगर येथील कॅनरा बँकेत माझे वैयक्तीक खाते आहे. माझ्या वैयक्तीक खात्यातून काही रक्कम तिरूपती ट्रान्सलाईन कंपनीला गेलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वैयक्तीक खात्यातून गेलेल्या रक्कमेस आरोपी क्र.२ हा जबाबदार नाही. आरोपी क्र.२ ने बँकेला चेकची रक्कम देवू नये असे कळविले होते का कसे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ ने फर्मला टाटा ४०७ चे वाहन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र.२ चे टाटा ४०७ हे वाहन बळजबरीने नेहून अज्ञात स्थळी लपवून ठेवले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ ने

माझे व माझे मुलाविरुध्द इंदापूर पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझेविरुध्द तक्रार दिलेमुळे माझा आरोपी क्र.२ वर राग होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ हा फिर्यादी कंपनीला बारा लाख पन्नास हजारचे कायदेशीर देणे लागत होता याचा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला सरतपासातील मजकूर सांगता येणार नाही. साक्षीदार सांगतो की, मला सरतपासातील तारखा बघितल्याशिवाय सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी व आरोपी क्र.३ यांनी संगनमत करून आरोपी क्र.२ च्या को–या चेकवरील सहयांचा गैरफायदा घेवून खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, तिरूपती ट्रान्सलाईन कंपनी हे सोमनाथ जाधव आणि नवनाथ जाधव हे पाहत होते. लक्ष्मी स्प्रे पेंटीगचे काम नवनाथ जाधव व मी बघतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ ची कोणतीही जबाबदारी नसताना खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

आरोपी क्र.२ तर्फे उलटतपास पुर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

**(ए. बी. पाटील)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.२१/०१/२०२६**